## आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष अहवाल - 2023-24

**आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष (DLLE)अंतर्गत प्रकल्प'महिला सक्षमीकरन शिक्षण कार्यक्रम "(WEEP) या अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2022 23 मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम खालील प्रमाणे—**

महाविद्यालयातील भाषा विभाग व आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष या दोन विभागातर्फे शैक्षणिक वर्ष 2023 24 मध्ये खालील कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात आले.

१ दिनांक सात जुलै ते 14 जुलै या कालावधीत महिला बालविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन.या कार्यक्रमात महाविद्यालयातील कनिष्ठ-वरिष्ठ मिळून 1120 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला

२ दिनांक 27 सप्टेंबर 2023 या दिवशी माहितीचा अधिकार या विषयावर एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन.

३ दिनांक 30 सप्टेंबर 2023 ते 2 ऑक्टोबर 2023 या कालावधीत दिवाळी कंदील तयार करण्यासाठी च्या कार्यशाळेचे आयोजन. (ही कार्यशाळा झाल्यानंतर सलग दोन महिने 18 विद्यार्थिनी नी कंदील बनवून रोजगार प्राप्त केला)

४ दिनांक ४ ऑक्टोबर व 5 ऑक्टोबर 2023 या दोन दिवशी विद्यार्थिनींना कापडी पिशव्या व बॅग बनवण्याच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आले.

५ दिनांक 20 व 21 ऑक्टोबर 2023 या दोन दिवशी पंत वालावलकर हॉस्पिटल डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपारिक खेळ व निसर्गोपचार या विषयावर आधारित बोंडला या कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले.या वेळी सलग दोन दिवस सुमारे 560 विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला

६ दिनांक १ नोव्हेंबर ते 10 नोव्हेंबर या कालावधीत कापड कागद व बांबू क्राफ्ट यावर आधारित दहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.हे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या DLLE च्या विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार C.C. अतर्गत 2 क्रेडिट (50 पैकी मार्क) देण्यात येतील.

७ दिनांक 2 जानेवारी 2024 रोजी कुटुंबातील संवादाचे महत्त्व  या विषयावर आधारित एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. विजय आनंदराव शिंदे ( कुटुंब प्रबोधन गतिविधी कोकण प्रांत) हे उपस्थित होते.

८ दिनांक 3 जानेवारी 2024 रोजी
९ स्वामी विवेकानंद  सप्ताह  व्याख्यान माला प्राचार्य शिवाजीराव भोसले व्याख्यान भाग-1 ते 7 दिनांक: १२/०१/२०२४ ते १८/०१/२०२४

आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष (DLLE) अंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित गीत गायन डॉक्युमेंटरी व नाट्य इत्यादींच्या एक दिवसीय भरगच्च कार्यक्रमांच्या आयोजन करण्यात आले.

**प्रकल्प कारकीर्द कौशल्य विकास शिक्षण (CSDE) या अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2022 23 मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम खालील प्रमाणे-**

जनशिक्षण संस्थान, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने **कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय ,भारत सरकार पुरस्कृत अन्नप्रक्रिया व साठवणूक प्रशिक्षण** (3 बॅच) उद्घाटन समारंभ संपन्न. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये एक बॅच 20 याप्रमाणे तीन बॅच साठी विद्यार्थ्यांनी समावेश घेतला हे तीनही प्रशिक्षण वर्ग डिसेंबर जानेवारी मार्च या तीन महिन्यात पूर्ण करण्यात आले हा संपूर्ण कार्यक्रम 79 दिवसांचा होता यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण 2020 प्रमाणे सीसी या विषयांतर्गत दोन क्रेडिट व 50 पैकी मार्क देण्यात येणार आहेत यामध्ये केंद्र शासनाच्या जनविकास संस्थान रत्नागिरी तर्फे वहिस्त परीक्षक नेमण्यात आले होते यामध्ये विद्यार्थ्यांना 15 मार्कांसाठी पेपर साठ मार्कांचा प्रॅक्टिकल व 25 मार्कांची उपस्थिती असे शंभर मार्कांचे परीक्षण करण्यात आले यासाठी होणाऱ्या प्रॅक्टिकल मध्ये **अन्नप्रक्रिया व साठवणूक** या अंतर्गत **विविध लोणची, जाम ,जेली, सरबत, तसेच अनेक पाकक्रिया शिकवण्यात आल्या.** अत्यंत यशस्वी पद्धतीने हे तीनही कोर्स पूर्ण करण्यात आले.

**आजीवन अध्ययन व विस्तार कक्ष (DLLE ) अंतर्गत लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम(PEP)अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये घेण्यात आलेले कार्यक्रम खालील प्रमाणे --**

1 दिनांक 12 जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये पंत वालावलकर रुग्णालय डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी हिमोग्लोबिन तपासणी व सामान्य आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. हे शिबिर दिनांक 12,13 व 14 जानेवारी 2024 असे तीन दिवसांचे आयोजन करण्यात आले.(ज्यामध्ये वजन उंची ब्लड प्रेशर व अन्य समस्या इत्यादींचा समावेश होता) लाभार्थी- 125

2 दिनांक दिनांक 25 जानेवारी या दिवशी महाविद्यालयामध्ये पंत वालावलकर रुग्णालय डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनीसाठी हिमोग्लोबिन तपासणी व सामान्य आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. हे शिबिर दिनांक 25 ,व 26 जानेवारी 2024 फेब्रुवारी असे तीन दिवसांचे आयोजन करण्यात आले.(ज्यामध्ये वजन उंची ब्लड प्रेशर व अन्य समस्या इत्यादींचा समावेश होता). लाभार्थी- 164

3 दिनांक 27 जानेवारी 2024 रोजी या प्रकल्पांतर्गत आरोग्याच्या विविध समस्यांविषयी विद्याथिनि ना मार्गदर्शन करण्यात आले तसेच स्वतः आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींना झालेल्या आजारांवर कोणत्या उपाययोजना कराव्या याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी डेरवण हॉस्पिटलचे खालील डॉक्टर उपस्थित होते.

डॉक्टर शिवांजली शर्मा **-मासिक पाळी व घ्यावयाची काळजी तसेच आहार**
डॉक्टर पूजा बनकर- **महिलांच्या समस्या आणि मेनोपॉज**

दिनांक 28 जानेवारी 2024 रोजी या प्रकल्पांतर्गत आरोग्याच्या विविध समस्यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच स्वतः आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींना झालेल्या आजारांवर कोणत्या उपाययोजना कराव्या याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी डेरवण हॉस्पिटलचे खालील डॉक्टर उपस्थित होते

1 डॉक्टर अविनाश माने --**मधुमेह समस्या व उपाय.**
2 डॉक्टर मोहित महाजन-**कावीळ समस्या व उपाय.**